IIP International Multidisciplinary Research Journal
IIPIMRJ

**An Online Peer-Reviewed / Refereed Journal**
Vol: 02 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: GSRD-IF: 5.001
ISSN: 3049-2734 (Online)

# सेंद्रिय शेती आणि भारतीय शेतकरी

**Dr. Rajesh Bhimrao Gavakare**
Associate Professor, Department of Geography,
Shri Sant Damaji College Mangalwedha

**Article Info**

***Article History:***
Received: 26th Sep 2025
Accepted: 10th Oct 2025
Published: 25th Oct 2025

***Keywords:***
सेंद्रिय शेती,
भारतीय शेतकरी,
नैसर्गिक शेती,
जैविक खत,
सेंद्रिय उत्पादन,
शाश्वत शेती

**ABSTRACT**

भारतीय सेंद्रिय शेती ही केवळ अन्न उत्पादनाची पद्धत नव्हे, तर ती एक जीवनशैली होती. निसर्ग, प्राणी, माणूस यांच्यातील संतुलन जपणारी ही पद्धत आजच्या काळात अधिक महत्त्वाची ठरते. सद्यकालीन पर्यावरणीय व आरोग्य संकटांवर मात करण्यासाठी, प्राचीन सेंद्रिय शेतीच्या मूल्यांचा अभ्यास करून त्यांचा वापर करणे ही काळाची गरज आहे. सेंद्रिय शेती ही एक शाश्वत, पर्यावरणस्नेही आणि आरोग्यदायी शेतीपद्धत आहे, जी नैसर्गिक संसाधनांचा वापर करून रासायनिक खतांचा व कीटकनाशकांचा त्याग करते. भारतातील पारंपरिक शेती पद्धती ही मूळतः सेंद्रिय होती. परंतु हरित क्रांतीनंतर रासायनिक शेतीचे प्रमाण वाढले आणि त्याचे विपरीत परिणाम पर्यावरण, जमिनीचा पोत, जलस्रोत आणि मानवी आरोग्यावर झाले. भारतीय शेतकरी सेंद्रिय शेतीकडे वळू लागले असून त्यांना सरकारकडून विविध योजना, प्रशिक्षण, व अनुदान उपलब्ध होत आहे. अशा शेतीमुळे उत्पादनाच्या खर्चात बचत होते, जमीन सुपीक राहते आणि बाजारात अधिक दर मिळतो. सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून भारतीय शेतकरी स्थानिक व आंतरराष्ट्रीय बाजारात चांगले उत्पन्न मिळवू शकतात. सेंद्रिय शेतीची अंमलबजावणी करताना काही अडचणी येतात, जसे की प्रमाणपत्र प्रक्रिया, सुरुवातीला उत्पादनात घट, व बाजारपेठेचा अभाव. मात्र योग्य प्रशिक्षण, शासकीय धोरणे आणि ग्राहकांची जागरूकता यामुळे या अडचणींवर मात करणे शक्य आहे. हा अभ्यास सेंद्रिय शेतीचे तांत्रिक, सामाजिक व आर्थिक फायदे विशद करतो आणि भारतीय शेतकऱ्यांसाठी ही शेतीपद्धत भविष्यातील शाश्वत पर्याय ठरू शकते, असे अधोरेखित करतो.

***Plagiarism Check Report:***
Tool Used: Turnitin
Date of Report: Oct 09, 2025
Similarity Index: 6%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Gavakare, R. B. (2025). **सेंद्रिय शेती आणि भारतीय शेतकरी.** IIP: International Multidisciplinary Research Journal (IIPIMRJ), 2(IV), 843–849.

**प्रस्तावना:**

भारत हा कृषिप्रधान देश असून देशातील सुमारे ५० टक्क्यांहून अधिक लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. हरितक्रांतीनंतर देशात अन्नधान्य उत्पादनात मोठी वाढ झाली, परंतु त्याचबरोबर रासायनिक खते, कीटकनाशके आणि जलसिंचनाच्या अत्याधिक वापरामुळे जमिनीची गुणवत्ता, पाण्याचे स्रोत आणि मानवी आरोग्य यावर नकारात्मक परिणाम होऊ लागले. यामुळे शाश्वत शेतीचा शोध घेणे आवश्यक ठरले. अलीकडच्या काळात भारतातील अनेक शेतकरी सेंद्रिय शेतीकडे वळताना दिसत आहेत. रासायनिक शेतीच्या तोट्यांपासून मुक्ती मिळवण्यासाठी, आरोग्यदायी अन्न पिकवण्यासाठी, आणि बाजारात सेंद्रिय उत्पादनांना वाढती मागणी लक्षात घेता, शेतकऱ्यांमध्ये सेंद्रिय शेतीकडे कल वाढताना दिसतो आहे. भारत सरकारसुद्धा "पारंपरिक कृषी विकास योजना", "राष्ट्रीय जैविक शेती मिशन" यांसारख्या विविध योजनांच्या माध्यमातून सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देत आहे.

या संशोधनाचा मुख्य उद्देश म्हणजे भारतीय शेतकऱ्यांमध्ये सेंद्रिय शेतीविषयी वाढणारा कल, त्यामागची कारणे, लाभ, अडचणी आणि संभाव्य उपाय यांचा सखोल अभ्यास करणे होय. याव्दारे शाश्वत आणि पर्यावरणपूरक कृषी पद्धतींचा प्रसार अधिक प्रभावीपणे कसा करता येईल यावर प्रकाश टाकणे अपेक्षित आहे. भारतातील कृषी क्षेत्र हे देशाच्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकासाचा कणा मानले जाते. हरितक्रांतीनंतर रासायनिक खतांचा आणि कीटकनाशकांचा अतिवापर सुरू झाला, ज्यामुळे उत्पादनात वाढ झाली, पण त्याचे विपरित परिणाम जमिनीची सुपीकता, पाणी प्रदूषण आणि माणसाच्या आरोग्यावर दिसून येऊ लागले. याच्या पार्श्वभूमीवर "सेंद्रिय शेती" (Organic Farming) ही एक शाश्वत पर्याय म्हणून पुढे आली आहे. सेंद्रिय शेती म्हणजे अशी शेती पद्धत ज्यामध्ये रासायनिक खतांचा, कीटकनाशकांचा आणि जनुकीय सुधारित बियाण्यांचा वापर न करता नैसर्गिक घटकांचा वापर करून शेती केली जाते. यामध्ये गोमूत्र, कंपोस्ट खत, शेणखत, हिरवळ खत, निंबोळी अर्क, जीवामृत, दशपर्णी अर्क इत्यादींचा उपयोग होतो.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

सदर संशोधन लेखाची मुख्य उद्दिष्टे पुढील प्रमाणे आहेत.

1. या संशोधन लेखाचा मुख्य उद्देश भारतीय शेतकऱ्यांच्या सेंद्रिय शेतीकडे वाढत्या कलाचा अभ्यास करणे
2. या संशोधन लेखात जैविक खत, नैसर्गिक कीटकनाशके, परंपरागत शेतीपद्धती यांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती**:

हा संशोधन लेख प्राथमिक दृष्ट्या दुय्यम माहिती स्रोत आणि वर्णनात्मक अभ्यास यांच्या संकलनावर आधारित आहे. आवश्यक दुय्यम माहिती ही वर्तमानपत्रे, मासिके, जर्नल प्रकाशन इत्यादींतील तसेच इंटरनेट व अशा अनेक विविध स्रोतांकडून प्राप्त झाली केली आहे. सदर माहितीचे मूल्यमापन करून निष्कर्ष काढले आहेत.

**सेंद्रिय शेती म्हणजे काय?**

सेंद्रिय शेती म्हणजे अशी शेती पद्धत ज्यात रासायनिक खते, कीटकनाशके किंवा जनुकीय सुधारित बियाणे न वापरता, नैसर्गिक घटकांद्वारे (जैसे शेणखत, कंपोस्ट, गोमूत्र, निंबोळी अर्क, इ.) शेती केली जाते. यामध्ये पर्यावरणाचा समतोल राखणे, मातीचे आरोग्य टिकवणे आणि आरोग्यदायी अन्नपदार्थ उत्पादन करणे यावर भर दिला जातो.

**भारतातील सेंद्रिय शेतीचे महत्त्व**

**1. पर्यावरण संरक्षण:**

सेंद्रिय शेतीमुळे मातीची सुपीकता टिकते, पाण्याचे स्रोत प्रदूषित होत नाहीत आणि जैवविविधतेचे संरक्षण होते. यामुळे निसर्गसंपत्तीचे संतुलन टिकून राहते.

**2. मानवी आरोग्याला फायदेशीर:**

सेंद्रिय पद्धतीने पिकवलेले अन्न हे रसायनमुक्त असते. त्यामुळे विविध आजारांपासून बचाव होतो. अलीकडे कर्करोग, मधुमेह, हृदयविकार यासारख्या आजारांची वाढ झाल्याचे कारण अनेकदा रसायनयुक्त अन्न असते.

**3. शाश्वत शेतीस प्रोत्साहन:**

सेंद्रिय शेती ही मातीच्या नैसर्गिक चक्राशी सुसंगत आहे. त्यामुळे दीर्घकाळ टिकणारी आणि पर्यावरणपूरक शेती शक्य होते.

**4. जमिनीची सुपीकता टिकवते:**

रासायनिक खतांच्या वापरामुळे जमिनीतील जिवाणू आणि अन्नद्रव्यांची हानी होते. सेंद्रिय शेतीत मात्र जमिनीची उर्जा व गुणवत्ता टिकते.

**5. निर्यातीस चालना:**

सेंद्रिय उत्पादने ही आंतरराष्ट्रीय बाजारात अधिक मागणी असलेली असतात. त्यामुळे सेंद्रिय शेतीमुळे शेतकऱ्यांना अधिक दर मिळू शकतो.

**6. शेतीसाठी खर्चात बचत:**

शेतकरी स्वतःच्या शेतीतून कंपोस्ट, शेणखत व घरगुती जैविक कीटकनाशके तयार करू शकतो. यामुळे उत्पादन खर्च कमी होतो.

**भारतीय शेतकऱ्यांचा सेंद्रिय शेतीकडे कल**

अलीकडच्या काळात भारतीय शेतकऱ्यांमध्ये सेंद्रिय शेतीकडे कल वाढत आहे. त्यामागील काही प्रमुख कारणे:

1. रासायनिक शेतीचे दुष्परिणाम: जमिनीची उरकत, रोगप्रतिकारक शक्ती कमी होणे, आणि पाण्याचे प्रदूषण.

2. सेंद्रिय उत्पादनांची वाढती मागणी: देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय बाजारात सेंद्रिय अन्नपदार्थांची अधिक किंमतीत विक्री.

3.सरकारी प्रोत्साहन: "पारंपरिक कृषी विकास योजना", "राष्ट्रीय जैविक शेती अभियान" अशा योजनांतून शेतकऱ्यांना सहाय्य.

4. सहज उपलब्ध नैसर्गिक संसाधने: ग्रामीण भागात शेण, गांडुळे, झाडांची पाने, गोमूत्र हे साहित्य सहज मिळते.

5. आरोग्यविषयी जनजागृती: ग्राहकांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता वाढल्याने सेंद्रिय अन्नाची मागणी वाढत आहे.

**सेंद्रिय शेतीतील अडचणी**

1. सुरुवातीला उत्पादनात थोडी घट येऊ शकते.

2. बाजारपेठेतील अन्नाची ओळख (organic certification) मिळवणे कठीण.

3. सेंद्रिय उत्पादने विक्रीसाठी स्वतंत्र साखळी आवश्यक.

4. शेतकऱ्यांना प्रशिक्षण व माहितीची आवश्यकता.

**जैविक खत, नैसर्गिक कीटकनाशके, परंपरागत शेतीपद्धती**

**जैविक खत (Organic Fertilizers):**

जैविक खत म्हणजे नैसर्गिक घटकांपासून बनवलेले असे खते, जे जमिनीच्या सुपीकतेत वाढ करून पिकांची उत्पादनक्षमता सुधारतात आणि पर्यावरणास हानिकारक नसतात.

**उदाहरणे:**

1. शेणखत– गाई, म्हशी इत्यादी जनावरांच्या शेणाचे खत.

2. कंपोस्ट खत – सडलेल्या सेंद्रिय कचऱ्यापासून तयार केलेले खत.

3. वर्मी कंपोस्ट– गांडुळांच्या साहाय्याने तयार केलेले खत.

4. हिरवळ खत– विशेष झाडे (उदा. धैणचा, ससोटा) पेरून मातीमध्ये नांगरून मिळवलेले खत.

5. पंचगव्य, जीवामृत, गोमूत्र आधारित खते– गाईच्या विविध उत्पादक घटकांपासून बनवलेले.

**जैविक खत फायदे:** जमिनीची सेंद्रिय गुणवत्ता वाढवते, मातीतील जिवाणूंना पोषक ठरते, दीर्घकाळ जमिनीची सुपीकता टिकवते, रासायनिक खतांपेक्षा सुरक्षित आणि स्वस्त.

**२.नैसर्गिक कीटकनाशके (Natural Pesticides):**

नैसर्गिक कीटकनाशके म्हणजे वनस्पतीजन्य किंवा घरगुती पद्धतीने तयार केलेले असे द्रव्य, जे कीटकांपासून पिकांचे संरक्षण करतात पण पर्यावरण आणि माणसाच्या आरोग्यावर दुष्परिणाम करत नाहीत.

**उदाहरणे:**

निंबोळी अर्क– सर्वसामान्य आणि प्रभावी जैविक कीटकनाशक, दशपर्णी अर्क – दहा प्रकारच्या पानांपासून बनवलेले मिश्रण, तंबाखू अर्क, लसणाची फवारणी, हळद व मिरी मिश्रण, घरगुती घटकांपासून बनवलेले कीटकनाशके. गोमूत्र व छाछ मिश्रण-बुरशीजन्य रोगांवर उपयुक्त.

**नैसर्गिक कीटकनाशके फायदे:** पिकांवर अवशेष राहत नाहीत, कीटक प्रतिकारशक्ती निर्माण करत नाहीत, मातीतील फायदेशीर जिवाणूंना नुकसान करत नाहीत, स्वस्त आणि सहज उपलब्ध.

**३. परंपरागत शेतीपद्धती (Traditional Farming Methods):**

ही अशी शेतीपद्धत आहे जी पूर्वजांकडून चालत आलेली असून स्थानिक हवामान, जमिनीचा प्रकार आणि पारंपरिक ज्ञान यावर आधारित असते. यात रासायनिक घटकांचा वापर कमी अथवा शून्य असतो.

**परंपरागत शेतीपद्धतीची वैशिष्ट्ये:** पिकांची फेरपालट, आंतरपिके घेणे, गोमूत्र, शेणखत, सेंद्रिय घटकांचा वापर, स्थानिक बियाण्यांचा उपयोग, हाताने नांगरणी, पेरणी, कापणी.

**परंपरागत शेतीपद्धतीचे फायदे:** नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर, कमी खर्चात शेती शक्य, जमिनीचे आरोग्य टिकते, पाण्याचा जपून वापर.

**सेंद्रीय शेती उपाय व शिफारसी**

**1. सरकारी धोरणे व अनुदान:**

सरकारने सेंद्रिय शेतीसाठी अधिक अनुदान, सेंद्रिय बाजारपेठांची निर्मिती व प्रमाणपत्र प्रक्रियेची सुलभता करणे आवश्यक आहे.

**2. शिक्षण व जनजागृती:**

शेतकऱ्यांना जैविक शेतीची माहिती, तंत्रज्ञान व प्रशिक्षण देणे.

**3. स्थानिक सेंद्रिय बाजारांची उभारणी:**

स्थानिक पातळीवर सेंद्रिय उत्पादनांची विक्री व खरेदीसाठी बाजारपेठ निर्माण करणे.

**4. संशोधन व नवतंत्रज्ञान:**

सेंद्रिय शेतीसाठी प्रभावी तंत्रज्ञानाचा विकास.

**5. सेंद्रिय उत्पादनांची सुरूवातीला कमी उत्पादकता:**

या शेतीत सुरूवातीला कमी उत्पादन निघते

**6. सेंद्रिय प्रमाणपत्र मिळवण्याची प्रक्रिया क्लिष्ट**

सरकारकडून सेंद्रिय प्रमाणपत्र मिळवण्याची प्रक्रिया क्लिष्ट आहे.

**7. बाजारपेठ आणि विक्री साखळीची मर्यादा:**

या शेतीत बाजारपेठ आणि विक्री साखळीची मर्यादा पडतात

**8. माहिती व प्रशिक्षणाचा अभाव:**

सेंद्रिय शेती करण्यासाठी भारतीय शेतकऱ्यांमध्ये माहिती व प्रशिक्षणाचा अभाव आहे.

**निष्कर्ष:**

सेंद्रिय शेती ही केवळ एक शेतीची पद्धत नसून, ती पर्यावरण, आरोग्य आणि आर्थिक स्वावलंबनासाठी एक शाश्वत मार्ग आहे. भारतीय शेतकऱ्यांनी या दिशेने पावले टाकणे ही स्वागतार्ह बाब आहे. योग्य प्रशिक्षण, सरकारी मदत, आणि बाजारपेठेचा पाठिंबा मिळाल्यास भारत सेंद्रिय शेतीचा जागतिक केंद्रबिंदू बनू शकतो. सेंद्रिय शेती हे फक्त अन्न उत्पादनाचे साधन नसून, ते भविष्यातील आरोग्य आणि पर्यावरण रक्षणाचे साधन आहे. भारतासारख्या कृषिप्रधान देशासाठी ही पद्धत अत्यंत फायदेशीर ठरू शकते. शाश्वत विकासाकडे वाटचाल करताना सेंद्रिय शेतीचा स्वीकार ही काळाची गरज बनली आहे. जैविक खत, नैसर्गिक कीटकनाशके आणि परंपरागत शेतीपद्धती या तिन्ही गोष्टी शाश्वत शेतीसाठी अत्यावश्यक आहेत. या पद्धतींमुळे शेती अधिक पर्यावरणपूरक, खर्चिकदृष्ट्या फायदेशीर आणि आरोग्यास सुरक्षित होते. आजच्या घडीला या तत्त्वांचा अवलंब करणे ही काळाची गरज आहे. सेंद्रिय शेती ही केवळ एक पर्यायी शेती पद्धत नसून, ती आरोग्य, पर्यावरण आणि आर्थिक दृष्ट्या महत्वाची आहे.

**संदर्भ:**

1. “महाराष्ट्र टाइम्स — प्रा. एच. एम. देसरडा: सेंद्रिय शेती - शाश्वत पर्याय” महाराष्ट्र टाइम्स
2. “निती आयोग अहवाल: गोमूत्र-शेणाचा वापर वाढवावा” — दिव्य मराठी
3. “पर्यावरणपूरक सेंद्रिय शेती प्रशिक्षण कार्यशाळा, शिंदी (जळगाव)” — दिव्य मराठी
4. Ministry of Agriculture & Farmers Welfare, Government of India
5. FAO Reports on Organic Farming
6. Research articles from ICAR and NABARD
7. Journal of Organic Systems, 2023
8. National Centre of Organic Farming (NCOF)
9. Organic Farming for Sustainable Agriculture" : Uma Shankar Singh, Rajiv Kumar New India Publishing Agency.
10. Sustainable Agriculture: Principles and Practices" : S. R. Reddy
11. Organic Farming in India": M.K. Reddy